शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती, कोल्हापूर.

# तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## तक्रार अर्ज क्रं.१३/२०२४

| | |
|---|---|
| प्रा.डॉ.हणमंत संपतराव पोळ<br>प्लॅट नं.४०४,ढोणे हाईटस्,ए बिल्डींग,<br>को ऑफ सोसायटी, एस नं.३३/४/४,<br>आंबेगाव बु. पुणे ४११०४६ | तक्रार अर्जदार |

विरूध्द्

| | |
|---|---|
| १. रयत शिक्षण संस्था, सातारा,<br>पोवई नाका, सातारा<br><br>२. श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ,<br>ता.खंडाळा, जि.सातारा | वि.प. |

रयत शिक्षण, सातारा या शिक्षण संस्थेचे श्रीपतराव कदम महाविद्यालय, शिरवळ, ता.खंडाळा, जि. सातारा येथील सेवानिवृत्त शिक्षक प्रा.डॉ.हणमंत संपतराव पोळ यांनी तक्रार निवारण समितीकडे दि.१३/१२/२०२४ रोजी तक्रार अर्ज दाखल केला आहे. अर्जामध्ये नमूद तक्रार खालीलप्रमाणे.

**तक्रारीचे स्वरूप :**

१) शिवाजी विद्यापीठ परिपत्रक एसयु/संलग्नता/स्थान/टे १/वंगार/१२७४ दि.०२ फेब्रुवारी २०१९ नुसार २) शिवाजी विद्यापीठ परिपत्रक एस यु/संलग्नता/स्थान/टे १/वंगार/२०९ दि.२९ डिसेंबर २०१८ नुसार ३) रयत शिक्षण संस्था, सातारा जा नं./उ.शि./१९३०९ दि.०१/०१/२०१९ प्राध्यापक पद/स्टेज ५ (एजीपी) १००००- स्थाननिश्चितीसाठी शिवाजी विद्यापीठ नमुन्यात अर्ज केला (दि.०१/०६/२००९ ते ०१/०६/२०१२) या कालावधीसाठी प्रस्ताव पाठवून दिला. महाविद्यालय जा. क्रं.८७९/२०१८-१९ दि.११/०२/२०१९ Rs.५०००/- प्लेसमेंट फी बॅंकेत जमा करून दि.११/०२/२०१९ रोजी महाविद्यालय पत्र जा.क्रं.४८७५ दि.१३/०५/२०१९ ची पूर्तता केली. शिवाजी विद्यापीठाने जा.क्रं.८५६७ दि.१९/०८/२०१९ च्या पत्रानुसार स्टेज ५ (एजीपी-१००००) साठी दि.२७/०८/२०१९ रोजी मुलाखतीसाठी व प्रेझेंटेशनसाठी मला बोलविले. परंतू प्रत्यक्षात मुलाखत न घेता आपण दि.३१/०५/२०१९ रोजी सेवानिवृत्त झाला आहात त्यामुळे आपली व जे इतर सेवानिवृत्त सहयोगी प्राध्यापक यांची मुलाखत न घेता नाऊमेद करून परत पाठविले. भारतीय

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती ★ कोल्हापूर.

घटनेनुसार (On ground of Equality & Natural Justice Denied by committee Chairman) हे Discrimination असून जा.क्रं.३६० दि.१४/१०/२०१९ नुसार नकार कळविला आहे.

**संस्था महाविद्यालयाचा अभिप्राय :**

शासनाने व शिवाजी विद्यापीठाने प्रा.डॉ.पोळ एच.एस यांना स्टेज-५ (एजीपी १००००/-) देण्यासाठी संस्थेची व महाविद्यालयाची काहीही हरकत नाही.

**समितीची निरिक्षणे :**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ खाली शिवाजी विद्यापीठाचे जनरल परिनियम निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यामधील कलम ३२५ अनुसार तक्रार निवारण समितीकडे केवळ विद्यापीठ किंवा महाविद्यालय किंवा मान्यताप्राप्त संस्था यामधील कार्यरत असणारे शिक्षक किंवा इतर सेवक यांनाच आपल्या तक्रारीचे निवारण करण्याकरिता तक्रार निवारण समितीपुढे तक्रार अर्ज दाखल करता येतो. कार्यरत या शब्दाचा अर्थ जो तक्रार दाखल करीत आहेत तो तक्रार दाखल करण्याच्या तारखेला कार्यरत आणि सेवेत आहेत असा अर्थ होतो. सेवेतून निवृत्त झालेले शिक्षक किंवा कर्मचा-यांना तक्रार निवारण समितीपुढे आपले गा-हाणे मांडता येत नाही असे दिसून येते. तथापि, त्यांची तक्रार निवारण करिता इतर मार्ग उपलब्ध आहेत. त्याचा ऊहापोह याठिकाणी करणे आवश्यक नाही. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ रद्द होवून महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ हा पारित करण्यात आला आणि त्यात कलम ७९ (१) अनुसार तक्रार निवारण समितीच्या गठनाबाबत तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. त्या कलमानुसार प्रत्येक विद्यापीठामध्ये राज्य सरकार किंवा त्यांचे कर्मचारी यांच्याविरूध्द् असलेल्या तक्रारी सोडून इतर सर्व तक्रारीच्या निवारणार्थ शिक्षक आणि इतर कर्मचारी, विद्यापीठ संलग्न स्वायत्त महाविद्यालये आणि मान्यता प्राप्त संस्था यांचे शिक्षक आणि इतर कर्मचारी यांना आपल्या तक्रारी तक्रार निवारण समितीपुढे मांडता येऊ शकतात. या कलमामध्ये महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ च्या कलम ३२५ मध्ये वर नमूद केलेला फरक (सेवेत/सेवेत नसलेल्या शिक्षक व कर्मचा-यांबाबत) असा फरक केलेला दिसून येत नाही. हे देखील खरे आहे की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम, २०१६ च्या कलम ८१ (१) अन्वये असे शिक्षक किंवा इतर कर्मचारी यांना सेवेतून निष्कासित करण्यात आल्याबाबत किंवा त्यांना सक्तीने सेवानिवृत्त केले असेल याबाबत किंवा त्यांची पदावनती झाली असेल याबाबत तक्रारी दाखल करता येऊ शकतात. परंतु या कलम ८१ (१) अन्वये जे नियमितरित्या वयोमानानुसार निवृत्त झालले आहेत त्यांच्याबद्दल तरतूद केल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे या समितीचे मत असे आहे की, तक्रारदार नियतवयोमानानुसार सेवेतून निवृत्त झाले

असल्या कारणांनी त्यांना या तक्रार निवारण समितीसमोर थेट येणे शक्य नाही. सबब, प्रस्तुतची तक्रार या समितीला तक्रारदार हे नियतवयोमानानुसार निवृत्त झाले असल्याकारणाने दाखल करुन घेता येणार नाही. त्यामुळे सदरची तक्रार नामंजूर करावी लागेल. सबब, ही समिती खालील आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुतची तक्रार खारिज करण्यात येत आहे

(झालेल्या निर्णयाच्या प्रती संबधिताना देऊन तसे कळविणेत यावे.)

शिवाजी विद्यापीठ, तक्रार निवारण समिती कोल्हापूर.

**दिनांक :** 20 MAR 2025

**सदस्य सचिव**
**(श्रीमती ए.ए.कदम)**

**सदस्य**
**(श्रीमती ए.एच.कोलेकर)**

**सदस्य**
**(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)**

**सदस्य**
**(डॉ.व्ही.एन.शिंदे)**

**सदस्य**
**(श्री.एस.यु.शिंदे)**

**अध्यक्ष**
**(श्री.ए.व्ही.देशपांडे)**